Vol II Issue IX

ISSN No : 2230-7850

Monthly Multidiciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

### *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

### *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 9, Oct 2012
ISSN:-2230-7850

Available on all social networks
citeulike

ORIGINAL ARTICLE

# औद्योगिक कामगारांच्या विविध समस्या व भारतीय मजदूर संघ

*सदानंद धकीते*

सहयोगी प्राध्यापक
श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर.

***सारांश :***

कामगार क्षेत्राच्या व्याप्तीचा विचार केल्यास असे म्हणता येईल की, जेवढे मनुष्याचे ऐहिक जीवन आहे तितकीच त्याची विशाल व्याप्ती आहे. राष्ट्राच्या विकासात श्रमाचे अनन्यसाधारण महत्व आहे. अनंत काळापासून भारतीय संस्कृतीत श्रमाला फार मोठी प्रतिश्ठा प्राप्त झाली आहे. भारतात औद्योगिकरणाला प्रारंभ झाल्यानंतर मोठया प्रमाणात कारखान्यांची निर्मिती झाली. परिणामतः देशातील लघु तसेच कुटीर उद्योग माघारले. त्यात काम करणाऱ्या हजारो कामगारांवर त्याचा विपरित परिणाम झाला. ज्या प्रमाणात कारखाने निर्माण झालेत आणि नवी यंत्रणा अस्तित्वात आली त्याप्रमाणात कुशल कामगार उपलब्ध नव्हते. अकुशल कामगारांना कार्याचा अनुभव नसल्यामुळे त्यांचे मोठया प्रमाणाम शोषण होत गेले.

***प्रस्तावना:***

नविन उद्योगांची स्थापना करण्याच्या मुख्य भुमीकेत परदेशी व काही भारतीयसुध्दा होते. पैशाला अधिक महत्व देणारे उद्योगपती व त्यांच्या पर्यवेक्षकांद्वारे होणारा भेदभाव तसेच दुर्व्यवहाराला भारतीय कामगार बळी पडत असत. कामगारांकडून अल्प मोबदल्यात जास्त वेळ काम करवून वस्तुंचे मोठया प्रमाणात उत्पादन करून अफाट नफा प्राप्त करणे ही प्रवृत्ती बळावली. याची प्रतिक्रिया कामगार वर्गात उत्पन्न होऊन मालक व कामगार असा संघर्श सुरू झाला. या विरूध्द ज्यावेळी आवाज उठविण्याचा प्रयत्न झाला त्यावेळी ब्रिटीश सरकारकडून आंदोलन दाबण्याचा पुरेपुर प्रयत्न झाला पण प्रयत्न असफल राहिला. तथापि देशात मजदूर संघाच्या निर्मितीची प्रक्रिया तेव्हापासूनच सुरू झाली. कामगार संघटनांच्या निर्मितीच्या प्रक्रियेत स्वातंत्र्यपूर्वी तसेच स्वातंत्र्य प्रप्तीनंतर विविध संघटना निर्माण झाल्या. त्यातीलच 1955 साली निर्माण झालेली भारतीय मजदूर संघ ही एक संघटना आहे. या संघटनेने कामगार समस्या सोडविण्याकरिता जे योगदान दिले त्यासंबंधी माहिती आपण यात जाणून घेणार आहोत.

**संशोधनाचा उद्देश :–**

1)कामगार संघनांचा उदय तथा विकास याचे विश्लेषण करणे.
2)भारतीय मजदूर संघाची स्थापना, विकास विचारधारा यांचा अभ्यास करणे.
3)औद्योगिक क्षेत्रातील कामगार व औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या समस्यांच्या कारणासंबंधी विवेचन करणे.
4)भारतीय मजदूर संघाच्या महासंघाद्वारे औद्योगिक कामगारांच्या ज्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला जात आहे त्यासंबंधी माहिती गोळा करणे.
5)विश्लेषणात्मक अध्ययन करून त्याआधारे निश्कर्श काढून त्यावर उपाययोजना सुचविणे.

**संशोधनाची गृहिते :–**

1) विविध कामगार संघटनांपेक्षा भारतीय मजदूर संघ सरस आहे.
2)समस्या सोडवितांना कामगार हित लक्षात घेऊन अन्य संघटनांच्या मदतीने समस्या सोडविल्या जातात.
3)भा.म. सघ एक गैरराजनैतिक संघटन असून राज्यकर्ते कोण आहेत याचा त्यांच्या कार्यावर परिणाम होत नाही.
4)कामगार समस्या सोडवितांना प्रथम चर्चा व शेवटचा उपाय म्हणून आंदोलन असते.

**कामगार संघटनांचा विकास :–**

कामगार हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. उद्योगधंदा, व्यवसाय, सेवा, उत्पादन यासाठी कामगाराला पर्याय नाही. असं असूनसुध्दा 'शोषण अन्यायाचा' बळी मात्र कामगाराचाच होतो. यंत्र युगानं औद्योगिक क्रांतीला जन्म दिला. औद्योगिक क्रांतीचा वाहक म्हणजे मालक. या मालकाने यंत्र आणि कामगारातला माणूस यांच्यातील सीमारेशा संपवून टाकली. कामगाराला यंत्रवत गुलाम केलं. या गुलामगीरीचे जोखड फेकून देण्यासाठी कामगाराला सापडलेलं शस्त्र म्हणजे 'कामगार संघटना'.

उद्योगातील कामगारांच्या अवस्थेचा विचार केल्यास असे लक्षात येते की, कामाचे तास निश्चित नसल्यामुळे कामगारांना दरदिवशी

**Please cite this Article as : *सदानंद धकीते, औद्योगिक कामगारांच्या विविध समस्या व भारतीय मजदूर संघ* : Indian Streams Research Journal (Oct. ; 2012)**

सोळा–सोळा तास काम, दुर्घटनाग्रस्त कामगाराबद्दल कमालीची बेफिकीरी, कामगारांच्या वाटयाला अमानुशता याशिवाय निर्धन, एकाकी, असंघटित कामगार व्यक्तीगत पातळीवर अशी अमानवी स्थिती बदलवू शकत नव्हता. एकटया दुकटयाच्या प्रयत्नाने यामध्ये सफलता प्राप्त करणे हे शिवधनुश्य उचलण्याएवढे अवघड काम होते. स्वसंरक्षण, स्वतःच्या स्थितीत सुधारणा आणि कामगारांच्या प्रश्नांची उकल याकरिता संघटित होण्याची गरज भासू लागली. काळाची गरज असल्यामुळे कामगार संघटना उभ्या राहू लागल्या.

भारतात राष्ट्रवादावर आधारित असलेल्या 'ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस' या पहिल्या संघटनेची, महान देशभक्त लाला लाजपतराय यांच्या अध्यक्षतेत 1920 साली स्थापना केल्या गेली. कामगारांच्या समस्या सोडवून स्वातंत्र्य चळवळीला कामगारांचा हातभार लागावा या शुध्द राष्ट्रभक्तीने प्रेरीत अशी ही कामगारी संघटना होती. कालांतराने रशियाच्या साम्यवादी क्रांतीने भारावून येथेही साम्यवादी कार्यकर्ते तयार झाले व त्यांनी ही संघटना देशभक्तीच्या शुध्द स्वरूपापासून दूर नेली. परिणामी कामगार व समाज यात फार मोठी दरी उत्पन्न झाली. त्यांची ध्येय–धोरणे एक प्रकारे समाजाला वेठीस धरण्याच्या पध्दतीची झाली. 'हमारी मॉंगे पूरी करो, चाहे जो मजबुरी हो' अशा समाजविघातक घोशणा दिल्या गेल्या. ''जगातील कामगारांनो एक व्हा'' अशी देशद्रोहाला खतपाणी घालणारी गर्भित घोषणाही त्यातुन पुढे आली. ''रोटी, कपडा, मकान'' इतक्यावरच कामगार संघटना मर्यादित झाल्या.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर राष्ट्रनिर्माण कार्यात कामगारांचा सक्रीय सहयोग व्हावा यासाठी 'इंटक' ही संघटना 1948 साली स्थापन झाली. पण ती 'कॉंग्रेस' या राजकीय पक्षाशी संलग्नीत असल्याने राष्ट्र, उद्योग व कामगार हिताकडे या संघटनेचे दुर्लक्ष झाले.

**भारतीय मजदूर संघाची विचारधारा :–**

भारत 150 वर्ष गुलामगीरीत राहिल्यामुळे जनतेला भारतीय विचारधारेचे काही प्रमाणात विस्मरण झाले त्यामुळे पराधिनता वाटयाला आली. पाश्चिमात्य विचारांचा प्रभाव कामगार चळवळीवरही झाला. त्यामुळे भारतीयतेवर आधारित कामगार चळवळ उभी करण्याचे दायित्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ट प्रचारक, थोर चिंतक दत्तोपंत ठेंगडी यांनी स्विकारले. त्यांनी भारतीय विचार व आचार यांचा योग्यप्रकारे अभ्यास करीत असतानाच अन्य कामगार संघटनांमध्ये काम करून त्यांचेही तत्वज्ञान, कार्यपध्दतीचा अभ्यास केला. विविध संघटनांचे प्रत्यक्ष कार्य जवळून पाहिले आणि त्याचे बारकाईने निरीक्षण करून संघटनात्मक कार्याचे चिकित्सक बुध्दीने विश्लेषण केले.

विशुध्द राष्ट्र हित, उद्योग हित व कामगार हित याला बांधिलकी असलेल्या संघटनेची स्थापना व्हावी ही गरज मा. दत्तोपंत ठेंगडी यांनी 23 जुलाई 1955 रोजी भोपाळ येथे भारतीय मजदूर संघाची स्थापना करून पूर्ण केली. शुध्द राष्ट्रभक्तीवर आधारित या संघटनेने आपल्या सुरवातीच्या काळात छोटया–छोटया क्षेत्रातील कामगारांच्या समस्या विचारात घेऊन कार्य प्रारंभ केले. ज्यामध्ये दुकान मजदूर संघ, रिक्षा मजदूर संघ इत्यादीसारख्या छोटेखानी संघटना होत्या. त्यानंतर प्रांतीय महासंघ, औद्योगिक महासंघ निर्माण करून मोठमोठया उद्योगांमध्ये आपल्या कामाचा विस्तार केला. कामगारांच्या विविध समस्या ऐकून घेणे व त्यासंबंधी उद्योग मालकांशी चर्चा करून त्या सोडविण्याचा प्रयत्न करणे या बाबींमुळे भारतीय मजदूर संघाने कामगार क्षेत्रात विश्वासार्हता निर्माण केली. 2002 साली केंद्र सरकारच्या श्रम मंत्रालयाद्वारे घेण्यात आलेल्या सदस्यता सत्यापनानुसार सर्वाधिक सदस्य संख्या असलेले भारतीय मजदूर संघ श्रमिक संघटन ठरले ज्याची सदस्य संख्या 62,15,797 (26.24:) यानंतर अनुक्रमे इंटक 39,54,012 (16.72:) तर आयटकची संख्या 34,42,239 (14.56:).

भारतीय मजदूर संघ हे कामगारांचे, कामगारांकरीता आणि कामगारांद्वारे चालविण्यात येणारे एकमेव गैरराजनैतिक कामगार संघटन आहे. केंद्रात किंवा राज्यात कोणतेही सरकार असो कामगारांवर होणाऱ्या अन्यायराविरूध्द लढण्यासाठी भारतीय मजदूर संघ सदैव कटीबध्द असतो. ज्याचे घोशवाक्य 'श्रमिकांचे राष्ट्रीयीकरण, राष्ट्राचे औद्योगिकरण व उद्योगांचे श्रमिकीकरण' हे असल्यामुळे कार्याचा मुख्य उद्देशच हा राश्ट्राचे पुर्ननिर्माण करणे, भारत देशाला बलशाली बनविणे, भारताला जगात प्रथम क्रमांकाचे सर्वशक्तिमान राष्ट्र म्हणून एक मानाचे स्थान प्राप्त करून देणे हे भारतीय मजदूर संघाचे स्वप्न आहे.

**भारतीय मजदूर संघाची कामगार समस्यांबाबत भूमिका :–**

भारतीस मजदूर संघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते कामगार समस्या सोडविण्यासाठी सामत्याने प्रयत्नरत असतात. त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांमुळेच या समस्या सोडविण्यात यश प्राप्त होत आले. चुकीच्या आर्थिक नीतीमुळे कामगार क्षेत्रावर आघात होतांना दिसतात त्यात – उद्योगांचा आटोपशीर आकार, सुयोग्य आकार या नावाखाली सर्वदूर कामगारांची होणारी छटनी, लादण्यात येणारी स्वेच्छा निवृत्ती योजना, कायम व नियमित स्वरूपी कामे कंत्राटी पध्दतीने किंवा नैमित्तिक पध्दतीने करवून घेणे, बरीच कामे आऊट सोर्सिंग मार्फत करवून घेणे, सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करणे, कामगारांचे हक्क हिरावून घेण्यासाठी कामगार कायद्यात बदल करणे, कर्मचारी भविष्य निधीवरील व्याजाचा दर कमी करणे, बॅंकांसारख्या उद्योगात नव्या पाळीपध्दती लादून कामाचा बोजा वाढविणे, लघुउद्योगांना असलेले संरक्षण काढून घेणे, उद्योगांचे आपला एक ठिकाणचा गाषा गुंडाळून दूसरीकडे स्थलांतरित होणे किंवा उद्योग बंद करणे, कारखान्याच्या रिकाम्या झालेल्या जागांवर मॉल्स उभे करणे किंवा श्रीमंतांसाठी घरे बांधणे इत्यादींसारख्या अनेक समस्या औद्योगिक कामगारांना भेडसावत आहे. परिणामतः संघटित क्षेत्रातील कामगार असंघटित क्षेत्राकडे स्थानांतरीत होतांना दिसतात. याला केंद्र सरकारचे उदासिनतेचे धोरण जबाबदार आहे. संघटित क्षेत्रात 7: कामगार तर असंघटित क्षेत्रात 93: कामगार कार्य करतांना दिसून येत आहेत.

मधल्या काळात सर्वसाधारणपणे कामगारांमध्ये असलेल्या अज्ञानाचा, दारिद्रयाचा, काही उद्योगपतींनी स्वस्थार्थाकरीता उपयोग करवून घेतला. कामगारांना भडकवून अराष्ट्रीय प्रवृत्ती जोपासण्याचा प्रयत्नही काही संघटनांनी केला. उदा. आणबाणीच्या काळात बोनसची रास्त मागणी सोडून देऊन कामगारांचा एकप्रकारे विश्वासघात करण्याचा प्रयत्नही झाला. राष्ट्रीय विचारसरणीच्या सर्व कामगार संघटनांत सामंजस्य उत्पन्न व्हावे, त्यांनी एकत्र येऊन या अराष्ट्रीय प्रवृत्तीचा सामना करावा अशीच भूमिका भा.म. संघाने प्रारंभापासून घेतली. 'एक उद्योग एक युनियन' ही फसवी घोशणा करण्यात आली होती परंतू भारतीय मजदूर संघाने 'एका उद्योगात एक राष्ट्रीय युनियन' असे त्यास उत्तर दिले.

उठसूठ मालकांविरूध्द वा सरकारविरूध्द कामगारांना भडकविण्याच्या प्रयत्नातून अनेक नव्या संघटना उदयास येत आहेत. केवळ सरकारने केलेल्या कायद्यांच्या मर्यादेतच कार्य करणे व सरकारच्या मर्जीनामर्जीवर आपले मार्ग ठरविण्याचे धोरणही स्वीकारलेल्या कामगार संघटना आहेत. कुठल्याही प्रश्नांचे संप–हरताळ–मोर्चे हेच उत्तर आहे असे मानणाऱ्या संघटना या क्षेत्रांत काम करीत आहेत. त्यांचा वाटाघाटी–मध्यस्थी–कायदे–कचेऱ्या यावर फारसा विश्वास नाही. याउलट भारतीय मजदूर संघाच्या ते वाटाघाटी, मध्यस्थी, पंच वा लवाद आदि न्याय मिळविण्याचे सर्व मार्ग संपल्यावर शेवटचे अस्त्र म्हणून संपाचा आश्रय घेतला 'नेहमीच रूप' किंवा कधीही संप नको अशा दोन्ही अतिरेकी विचारांचा त्याग करून 'अत्यावश्यक असेल तरच संप' ही भूमिका कामगार समस्या सोडवितांना भारतीय मजदूर संघाची आहे.

भारतीय मजदूर संघाचा विचार आहे की, ज्या यंत्रावर कामगार काम करतो त्याची पूजा करावयाची असते, ते चांगले चालवायचे असते, त्याची काळजी घेऊन त्याची कार्यक्षमता वाढवायची असते. गिरण्या, कारखाने किंवा उद्योग बंद पडावयाची वेळ आली असता आपल्या शक्ति–युक्ति–बुध्दीचा वापर करून चालु ठेवण्यासाठी काय करता येईल, चूक कोठे आहे ती शोधून त्याच्या पूर्तीसाठी ती चूक सुधारण्यासाठी भारतीय मजदूर संघ प्रयत्नशील असतो. उद्योग लिलावात काढून, तो कायस्वरूपी बंद होण्यात कागारांचेच नुकसान आहे ही भा.म संघाची

मूलभूत कल्पना आहे.

पाश्चात्य विचारप्रणालींचे अनुकरण करून समाज हा मालक–मजूर–धनिक अशा दोन भागात वाटला गेला आहे आणि एकाच्या उध्दारासाठी दुसरा समूळ नाहीसा झाला पाहिजे ही कल्पना भारतीय विचारसरणीशी पूर्णपणे विसंगत आहे. सुतार, सोनार, लोहार, शिंपी, न्हावी के कुणाचे नोकर नाहीत, कुणाचे मालकही नाहीत. ते असलेच तर ते समाजाचे नोकर आहेत. समाजासाठी त्यांनी हे व्रत स्वतःहून पत्करले आहे. आजच्या व्यवस्थेत खाजगी, सरकारी, सहकारी इत्यादी भाग पडतात. उत्पादनांत होणाऱ्या नफ्याच्या वाटयात मालक व मजदूरांबरोबरच उर्वरित समाजाचाही विचार करावा लागेल अशी भा.म. संघाची भूमिका आहे. उद्योग, व्यवसाय व धंदा चांगला चालण्यासाठी त्यात काम करणाऱ्या प्रत्येकाला तो आपला आहे असे वाटले पाहिजे. त्यासाठी त्यांत कामगारांची भागीदारी राहिली पाहिजे, हळूहळू वाढली पाहिजे असा मजदूर संघाचा दृश्टीकोन आहे. यातूनच कामगारात अधिकारांबरोबरच कर्तव्याची जाणीव वाढीस लागेल.

राष्ट्रीय स्तरावर निर्माण होणाऱ्या समस्या ज्यांची झळ औद्योगिक कामगारांसह समाजातील अन्य घटकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे पोहोचते अशा समस्या उदा. बेरोजगारी, गरीबी, भ्रश्टाचार, वाढती महागाई, आतंकवाद आदी समस्यांकडे भारतीय मजदूर संघ राष्ट्रीय स्तरावर जातीने लक्ष ठेऊन आहे. या मुद्दयांबाबत भारतीय मजदूर संघ सरकारने योग्य पावले उचलावित यासाठी सरकारला आवश्यक त्या योजना सुचवत असते यासाठी भा.म. संघाला राष्ट्रीय स्तरावर अन्य कामगार संघटनांचे योगदान प्राप्त होत आहे.

या प्रमुख समस्यांच्या व्यतिरीक्त भारतीय मजदूर संघाचे औद्योगिक कामगारांच्या समस्या सोडविण्याकरीता विविध सफल आंदोलने गेल्या 25 वर्षाच्या कालावधीत करण्यात आलीत त्यात प्रामुख्याने –

सुझलॉन विंडफॉर्म कर्मचारी आंदोलन, ॲटोमॅटिक वायरींग सिस्टीम या विदेशी कंपनीमध्ये अनोखे आंदोलन व यश, अखिल भारतीय विद्युत मजदूर महासंघ, छत्तीसगढ येथे बोनसच्या मागणीसाठी आंदोलन, उपार्जित सुट्टयांसंबंधी आंदोलन, विद्युत मंडळाचे खाजगीकरण रोखण्यासाठी आंदोलन, पॉवर स्टेशनची आगीपासून रक्षण, वीज कामगारांचा निवृत्ती वेतनाचा प्रश्न, ऑर्डनन्स फॅक्टरी भंडारा येथील आंदोलन, अखिल भारतीय खदान मजदूर संघातील वेतन करार, कोयला उद्योगाच्या खाजगीकरणाचा विरोध, खाण कर्मचाऱ्यांना अण्डर ग्राऊंड भत्त्यावर आयकरात सुट मिळविण्यात मिळविलेले यश, खाणीमध्ये मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटूंबीयांना 5 लाखांची मदत, एन.ओ.बी.डब्लु. येथील चतुर्थ श्रेणीतील कामगारांची भरतीसाठी आंदोलन, निवृत्ती वेतनसाठी आंदोलन, संगणक भत्यासाठी आंदोलन, पी.एल.एल.आय. योजना लागु करण्यासाठी आंदोलन, भंडारा जिल्हा सेंन्ट्रल को–ऑपरेटिव्ह बॅंकेतील आंदोलन, वेतनवाढीसाठी आंदोलन, केंन्द्र सरकारच्या 'झिजिया' कराविरूध्द आंदोलन, सोलापूरचा किर्लोस्कर ऑईल इंजिन्स शिवशाहीचा लढा, सुखजीत स्टार्च एण्ड केमिकल्स लिमी. मधील लढा, युनिव्हर्सल ड्रिंक्स, नागपूर येथील आंदोलन, सेंच्युरी एन्का येथील आंदोलन, ॲम फोर्ज भांडूप येथील आंदोलन, जालंधर येथील सरूप टेनरीज मधील आंदोलन, परिवहन महामंडळाला भेडसावणारा अवैध प्रवासी वाहतूकीचा प्रश्न, परिवहन मंडळाचा बचाव, आंगनवाडी सेविका व सहाय्यीका यांचे मानधनाकरीता लठा, आंगनवाडी सेविका व मदतनीसांना सरकारी नोकरांचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी आंदोलन, नगर पालिका पटीयाळा येथील आंदोलन, चूंगी विभाग समाप्तीच्या विरोधात आंदोलन, पाच दिवसांच्या सप्ताहासाठी लढा इत्यादींचा उल्लेख करतो येईल. या सर्व आंदोलनामध्ये मिळालेल्या यशाचा फायदा सरळसरळ कामगारांनाच झाला.

उद्योगात निर्माण होणाऱ्या औद्योगिक समस्या (Industrial disputè) उदा. सेवा शर्ती, वेतन पुर्ननिर्धारण, बदली आणि बढती, अनुशासनात्मक कारवाई आदी. हाताळण्याची व सोडविण्याची जबाबदारी संबंधीत औद्योगिक महासंघाकडे देण्यात आली आहे. आवश्यकतेनुसार भारतीय मजदूर संघ औद्योगिक महासंघांना या संदर्भात मार्गदर्शन करीत असते.

भारतीय मजदूर संघाची विचारसरणी ही संपूर्णपणे राष्ट्रीय, विधायक, जल्दबाजीच्या मोहाला बळी न पडता ध्येयवादाला चिकटून राहणारी, राजकारणांतील स्वभावाची जाणीव ठेवून साऱ्या गोष्टींचा स्वीकार करणारी शास्त्रीय, सर्वांना समान माननारी अन् पूर्णपणे भारतीय आहे. तिच्या आधारे कामगार क्षेत्रातील समस्यांची सोडवणूक करण्याच्या विश्वासानेच, त्याच एका ध्येयाने भारतीय मजदूर संघ या क्षेत्रात कार्य करीत आहे.

**निष्कर्ष :–**

1)भारतीय मजदूर संघाची आज जी प्रगती झाली आहे त्याचे मुळ कारण त्यांनी कामगारांच्या समस्यांचे निराकरण केलेले आहे असे दिसून येते. समस्या निराकरण न करता कोणतेही संघटन प्रगती करूच शकत नाही.
2)संघटित क्षेत्रामध्ये भारतीय मजदूर संघाचे कार्य चांगले आहे.
3)भारतीय मजदूर संघ कामगार समस्या सोडवितांना देशहिताला प्राधान्य देतांना दिसून येतो.
4)भारतीय मजदूर संघाची संघटनात्मक घडी व्यवस्थित असल्यामुळे कार्य प्रगती करतांना दिसून येते.
5)समस्या सोडवितांना चर्चा, मध्यस्थी, पंच, लवाद इत्यादी न्याय मिळविण्याचे सर्व मार्ग संपल्यानंतर शेवटचे अस्त्र म्हणून संप आहे यावर भारतीय मजदूर संघाचा भर असलेला दिसून येतो.
6)भारतीय मजदूर संघ फक्त स्थानीक स्तरावरील कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करतो असे नाही तर राश्ट्रीय तसेच आंतरराश्ट्रीय पातळीवरील कामगारांशी निगडीत असलेल्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतो असे निदर्शनास आले.

***शिफारशी :–***

1)भारतीय मजदूर संघ 1955 वर्षापासून कामगार समस्या सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे परंतू हा प्रयत्न फक्त 7ः संघटीत कामगार क्षेत्रापुरता मर्यादित आहे. असंघटित कामगारांची संख्या 93ः आहे. त्यांनाही संघटित करण्याची आवश्यकता आहे त्यादृश्टीने भारतीय मजदूर संघाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.
2)समस्या निर्माण झाल्यानंतर ती समस्या अधिक गंभीर होण्याची वाट न बघता ती त्वरीत सोडविण्याचा प्रयत्न सरकार तसेच उद्योग मालकांनी करावा यासाठी भारतीय मजदूर संघाने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.
3)असंघटित क्षेत्रात कार्य वाढविण्याच्या दृश्टीने मोठया प्रमाणाम कार्यकर्त्यांची आवश्यकता भासणार आहे. यादृश्टीने भारतीय मजदूर संघाला प्रयत्न करावे लागणार आहे.
4)आज देशात 49ः कामगारांची संख्या आहे. ही मोठी शक्ती देशात सुयोग्य परिवर्तन घडवून आणु शकते. आवश्यकता आहे त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याची, यादृश्टीने भारतीय मजदूर संघाने पुढाकार घ्यावा.

**संदर्भ ग्रंथ सूची**



| ग्रंथ नाम | लेखक | प्रकाशक |
|---|---|---|
| १) भारतीय मजदूर संघ परिचय | दत्तोपंत ठेंगडी | भारतीय मजदूर संघ, नई दिल्ली |
| २) भारतातील कामगार चळवळ | मॅथ्यु के. एम. | केंद्रिय श्रमिक शिक्षा बोर्ड, नागपूर. |
| ३) भारत में श्रम संघ | राम नरेश सिंह | भारतीय मजदूर संघ, कानपूर. |
| ४) भारतीय मजदूर संघ अधिवेशन महामंत्री प्रतिवेदन सन १९६७—२००५ पर्यंत | | भारतीय मजदूर संघ, नई दिल्ली. |
| ५) कामगार विश्व दशा आणि दिशा | गो.नि.हडप | रसीकराज प्रकाशन, नागपूर. |
| ६) शून्य से शिखर तक | मुकुंद गोरे | भारतीय श्रमशोध मंडळ, पुणे. |
| ७) सामाजिक संशोधन पध्दती | प्रा.बी.एम.कऱ्हाडे | |

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net